ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# पेडगाव (ता. श्रीगोंदा) येथील यादव–कालीन मंदिर स्थापत्यः ऐतिहासिक वारसा

प्रा. वाजगे नवनाथ दत्तात्रय,
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख,
इतिहास विभाग, सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा,ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर,



**गोषवारा ( Abstract ) :–**
श्रीगोंदा तालुक्याला मंदिर स्थापत्याचा अनमोल ठेवा लाभला आहे. श्रीगोंद्यामध्ये यादवकाळात फार मोठया प्रमाणावर मंदिरांची उभारणी झाली. श्रीगोंदा तालुक्यामध्ये विविध ठिकाणी ही मंदिरे आढळत असून त्यांची संख्या 15 इतकी आहे. मंदिर स्थापत्याच्या विशिष्ट शैलीवरुन ही मंदिरे हेमाडपंती शैलीतील मंदिरे किंवा भूमिज शैलीतील मंदिरे म्हणून ओळखली जातात. या मंदिरांपैकी पेडगाव या गावामध्ये पाच मंदिरे असून ही मंदिरे स्थापत्याच्या शैलीवरुन हेमाडपंती शैलीतील मंदिरे आहेत हे लगेच लक्षात येते. शिव, लक्ष्मी–नारायण व भैरोबा अशा विविध देवतांची ही मंदिरे असून यातील लक्ष्मी–नारायण मंदिर हे चालुक्य व यादव (हेमांडपंती शैली) शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. एकाच ठिकाणी थोडया थोडया अंतरावर असलेली ही मंदिरे म्हणजे यादवकालीन मंदिर स्थापत्याचा ऐतिहासिक ठेवा आहे असे म्हणता येईल.

**पारिभाषिकशब्द ( Keywords ) :–**
स्थापत्य, घटपल्लव, स्तंभकक्ष, गर्भगृह, मुखमंडप, अर्धमंडप, अंतराल, शिखर, बाहयांग, पीठभाग, वामनभिंती, कक्षासन, जालभित्ती, तलविन्यास, भद्र, नंदिका, खूर, गजथर, अश्वथर, कुंभ, कलश, मंची, मंडोवर, रथिका, उद्‌गम, भरणी, शिरावटी छाद्रम, देवकोष्ठ, वितान, जगती इ.

**साधन चिकित्सा ( Review of Literature ) :–**
श्रीगोद्यातील व अहमदनगरमधील मंदिर स्थापत्यावर सर्वप्रथम प्रकाश टाकणारे अभ्यासक म्हणजे हेन्री कझिन्स हे होत. 'चालुक्यन आर्किटेक्चर' व 'द मेडिवल टेंपल्स ऑफ डेक्कन' या ग्रंथांमधून त्यांनी यादवकालीन हेमांडपंती मंदिर स्थापत्य शैली किंवा भूमित्र शैलीवर सर्वप्रथम प्रकाश टाकला. त्यानंतर डॉ.ए.व्ही.नाईक यांनी 1930 ते 1940 च्या दशकात दख्खनमधील स्थापत्यप्रकारांचा विस्तृत आढावा घेतला. ए.व्ही.नाईक यांनी महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्य आणि शिल्प यांचा स्वतंत्र अभ्यास केला. त्यानंतर डॉ. गो.ब.देगलूरकर (विदर्भ) व डॉ. प्रभाकर देव (मराठवाडा) यांनी मंदिर स्थापत्याच्या अभ्यासात

आणखी भर टाकली.

सु.र.देशपांडे यांनी 'यादव शिल्पवैभव' या ग्रंथामध्ये श्रीगोंद्यातील नऊ मंदिरांचा उल्लेख केला आहे. तर ओ.पी.वर्मा यांनी 'A survey of Hemadpanti Temples in Maharashtra' या सर्व्हेमध्ये यादवकालीन सहा मंदिरांची नोंद घेतली आहे. प्र.रा.अहिरराव यांनी 'Survey of Hemadpanti Temples in India' या ग्रंथामधून नऊ मंदिरांची नोंद घेतली. तर डॉ. अशोक कानडे यांनी अहमदनगरमधील सुमारे शंभर मंदिरांचा अभ्यास आपल्या पीएच.डी.प्रबंधामधून केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या दार्शनिका विभागामार्फत प्रसिध्द केलेल्या 'अहमदनगर गॅझेटियरमध्ये' देखील श्रीगोंद्यातील मंदिरांची नोंद घेतली गेली आहे.

## संशोधन पध्दती ( Research Methodology ) :–

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक पध्दती, स्थळ भेटीद्वारा अभ्यास, स्थळांचे व मंदिरांचे सर्वेक्षण व निरीक्षण अशा संयुक्त पध्दतीने संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय मूर्तीशास्त्र, शिलालेख, भूगोल, भाषाशास्त्र इ. विषयांचा आंतरविद्याशाखीय दृष्किोन समोर ठेऊन अभ्यास करण्यात आला आहे.

## पेडगाव (ता.श्रीगोंदा) येथील मंदिर समूह

श्रीगोंदा या तालुक्याच्या ठिकाणापासून सुमारे 13 कि. मी. अंतरावर पेडगाव नावाचे गाव असून पांडे पेडगाव, पेडगाऊ, पेडगौ या नावाने या गावाचे उल्लेख आढळतात. श्रीगोंद्यातून वाहत येणारी सरस्वती नदी आणि भीमा नदी या दोन नदयांच्या संगमावर हे गाव वसलेले असून अगदी नदीजवळच पाच मंदिरांनी बनलेले एक मंदिर संकुल आहे. यामध्ये लक्ष्मी नारायण मंदिर, बालेश्वर किंवा बाळेश्वर, रामेश्वर, मल्लिकार्जुन किंवा मुंडेश्वर आणि भैरवनाथ अशी पाच मंदिरे आहेत. ही सर्व मंदिरे यादवकालीन स्थापत्य शैलीचा वारसा सांगतात. या शैलीला 'हेमाडपंती मंदिर शैली' या नावाने किंवा 'भूमिजाशैली' या नावाने देखील ओळखले जाते. [1]

## 1) लक्ष्मी नारायण मंदिर

बाराव्या शतकाच्या मध्यानंतर अहमदनगर जिल्हयातील पेडगाव येथील पाच मंदिरातून यादवकालीन स्थापत्य शैलीचे पुढचे पाऊल दिसते. पेडगाव येथील लक्ष्मी नारायणाचे मंदिर हे 54 फूट लांब आणि 35 फूट रुंद असले तरी त्याची प्रमाणबध्दता आणि तक्षण वैपुल्यामुळे ते आपल्या श्रेणीचे आदर्श बनलेले आहे. या इमारतीच्या स्थापत्याचे वैशिष्टय असे की, येथील स्तंभात घटपल्लव हा घटक नव्यानेच आढळतो. झोडगा व कोकमठाण येथेही हा घटक आढळतो. तो बहुधा गुजरातमधून आयात केला असावा. स्तंभकक्षाच्या भिंतीवर दुसरी मौलिक युक्ती दिसते की, त्यावर सच्छिद्र चौकोनी आकृती असल्यामुळे गर्भगृहापेक्षा सभागृहात प्रकाश आणि वारा येऊ शकतो. ही युक्ती चालुक्य मंदिरातून घेतली असावी. [2]

पेडगाव येथील लक्ष्मी–नारायण मंदिराचा मुखमंडप, दोन अर्धमंडप असलेला विनाखांबी मंडप, अंतराल आणि गर्भगृह असा तलविन्यास आहे. मंडपापापैकी दोन्ही अर्धमंडपांची कमालीची पडझड झाली आहे. अर्धमंडपावरील शिखरांवर आणि गर्भगृहावरील शिखरावर कोणतीही व्यवच्छेदक लक्षणे आता उरलेली नाहीत. गर्भगृहावर विटांनी बांधलेले शिखर आहे. या मंदिराचे उल्लेखनीय वैशिष्टय म्हणजे मंडपाचे बाहयांग होय. पीठ भागावर मंडपाच्या तिन्ही बाजूंनी वामनभिंती आहेत. पण या वामनभिंतीवर कक्षासनाऐवजी जलभित्ती आहेत. [3]

गर्भगृहाचा तलविन्यास पंचरथ असून त्याच्या भद्रांना नंदिका आहेत. पीठ भागावर अलंकरणात्मक नक्षी असलेले खूर, त्यावर गजथर आणि त्यांच्याही वर अश्वथर असे थर आहेत. अश्वथरावर कुंभ, कलश आणि मंची, त्यावर मंडोवरावरील रथिका आणि त्याहीवर उद्‌गम, भरणी आणि शिरावटी व सगळयात शेवटी छाद्‌म येते. नेहमी जेथे देवमूर्ती दाखविल्या जातात त्या तवंगाच्या मधील जागेत असलेला नरथर हे या मंदिराचे आणखी एक वैशिष्टय आहे. जंघा पातळीवर विष्णूची चोवीस रुपे, वराह अवतार आणि परिवार देवताही दाखविल्या आहेत. या परिवार देवतांमध्ये हनुमानचाही समावेश आहे.

पेडगाव येथील गजथर आणि अश्वथर हे औंढा येथील नागनाथ मंदिरावरील गजथर आणि अश्वथर याप्रमाणे आहेत. हेन्री कझिन्स यांच्या मते पेडगाव आणि औंढा येथील पीठ आणि त्यावरील आडव्या थरावरील शिल्पकाम यावर उत्तर गुजरातमधील शिल्प शैलीचा प्रभाव आहे. [4] औंढा नागनाथ येथील नागनाथ मंदिर म्हणजे चालुक्य, होयसळ, यादव स्थापत्यशैलीचे एक उत्तम उदाहरण आहे. होयसळ मंदिरातील पटटयांवर जसे

शिल्पकाम आहे. तसेच येथेही आडव्या पट्टयांवर शिल्पकाम आहे. गजथरानंतर येणारा अश्वथर हा पेडगावच्या लक्ष्मीनाराण मंदिराच्या थराप्रमाणे आहे. [6] तसेच पेडगावच्या लक्ष्मी–नारायण मंदिराची जगती ही राहेर येथील नरसिंहमंदिराच्या जगतीप्रमाणे आहे. गजथराच्या ऐवजी लोझेन्झे रोजेट्टी या नक्षीचा वापर येथे केला गेला आहे. [7]

मंडपाच्या अंतर्भागात रंगशिलेवरील चार स्तंभ सोडले तर इतर कोणतेही स्तंभ नाहीत. अंतरालाचोद्वार भित्तीसंगत स्तंभांनी बनले आहे. मंदिराच्या अंतर्भागात एकूण चार देवकोष्ठे आहेत. दोन देवकोष्ठे मंडपातील मागच्या भिंतीत आहेत. तर बाकीची दोन अंतरालातील बाजूच्या भिंतीमध्ये आहेत. मंडपातील स्तंभांचा घटकक्रम भद्रप्रकारचा आहे. म्हणजेच खाली तळखडा, त्यावर कुंभी, त्यावर चौरसाकृती खांब, तोच खांब पुढे अष्टकोनी बनतो व त्यावर पूर्णकलश, त्यावर आणखी दोन घटक आणि त्याच्याहीवर उद्गम, भरणी आणि कीचकहस्तयुक्त शिरावटी असा आहे. हा स्तंभ घटकक्रम अंबरनाथ मंदिरांच्या स्तंभांशी मिळता जुळता आहे. पण यातील दोन घटक अंबरनाथ मंदिरातील स्थंभापेक्षा निराळे आहेत. उद्गमाखाली असलेला पूर्णघट घटक आणि भरणीच्या तळाशी आमलकपट्ट हे ते दोन घटक होत. [8]

येथील मंदिरातील गर्भगृहाचे द्वारदेखील उल्लेखनीय आहे. हे द्वार पंचशाख पध्दतीचे असून या शाखांवर आतल्या बाजूने सुरुवात केली असता अनुक्रमे, कल्पलता, गंधर्व, स्तंभ, पद्मलता आणि व्याल आहेत. द्वारशाखांवर खालच्या भागात गंगा आणि यमुना यांच्या प्रमाणेच चौरीधारक आणि वैष्णव द्वारपाल दाखविले आहेत. द्वारावर आकृति शिल्पांचे आणि अलंकरणाचे प्राचुर्य असले तरी उत्तरांगावरील रथिकांमध्ये मात्र देवमूर्तीऐवजी चौकटचे आकार कोरले आहेत. [9] या मंदिराचे वास्तुषास्त्रीय तपशील आणि शिल्पशैली लक्षात घेता हे मंदिर इसवी सनाच्या 12 व्या षतकाच्या सुरुवातीला बांधले असावे असे मत अ.प्र.जामखेडकर हे व्यक्त करतात.

लक्ष्मी नारायण मंदिराचे गर्भगृह सर्व साधारण जमिनीच्या सपाटीपेक्षा खालच्या बाजूस आहे. मुख्य प्रवेशद्वारावर द्वारपालाखेरीज इतरही सुंदर नक्षीकाम आहे. या मंदिराचा सभामंडप भव्य असून सभामंडपाच्या दक्षिण, उत्तर आणि पश्चिम या दिशांना प्रत्येकी एक याप्रमाणे तीन प्रवेशद्वारे आहेत. सभा मंडपात पुष्पपात्र आणि पानाफुलांचे नक्षीकाम आहे. त्याचप्रमाणे मंगल कलशाचे शिल्पही अतिशय रेखीव असून त्याचे नक्षीकाम व रेषा समांतर आहेत. मंदिराच्या बाहेरील भिंतीवर कितीतरी स्त्री– पुरुपांच्या, देव – देवतांच्या व वेगवेगळया प्राण्यांच्या शिल्पाकृती दिसून येतात. सर्वात खालच्या बाजूस हत्ती आणि घोडयांच्या रांगा, त्यानंतर मधल्या भागात यक्ष–यक्षिणींची चित्रे आणि वरच्या बाजूला निरनिराळया देवदेवतांची चित्रे आपणास पहावयास मिळतात. [10]

पेडगावमधील लक्ष्मी–नारायण मंदिर हे श्रीगोंद्यातील महालक्ष्मी मंदिर, कोळगावचे लक्ष्मी नारायण मंदिर आणि मांडवगणचे लक्ष्मी नारायण मंदिर या मंदिराच्या सदरात मांडतील पर्सी ब्राऊन यांनी आपल्या इंडियन आर्किटेकचर बुध्दीसट हिंदूज या पुस्तकात या मंदिरावर इंडो आर्यन वास्तुकलेच्या पध्दतीची छाप आहे असे म्हटले आहे. [11]

भारतीय पुरातत्व खात्याचे प्रमुख हेन्री कझिन्स यांनी भारतातील मंदिरांचा सर्वे केला होता. मे 1890 ते जानेवारी 1891 या दरम्यान हेन्री कझिन्स हे पुणे हेडक्वार्टर्स येथे कार्यरत होते. 11 फेब्रूवारी 1891 रोजी हेन्री कझिन्स व त्यांचे सहकारी पेडगाव याठिकाणी पोहचले. त्यांना याठिकाणी चार हेमांडपंती शैलीची मंदिरे आढळली. त्यातील लक्ष्मी नारायण हे मंदिर थोडयाषा चांगल्या स्थितीत आढळले. हे मंदिर पाहून ते प्रभावित झाले. याठिकाणी हेन्री कझिन्स यांच्या टिमने या मंदिर समूहातील मंदिरांची ड्रॉईंग्ज तयार केली तसेच मंदिराचे सात फोटो देखील काढले. पुढे 3 मार्च 1891 रोजी हा चमू कर्जत याठिकाणी मंदिर सर्वेक्षणासाठी निघून गेला. [12] हेन्री कझिन्स यांनी लक्ष्मी नारायण मंदिर तसेच मंदिराच्या समोरील बाळेश्वरांचे मंदिर यावर विशेष लक्ष दिले. त्या प्रयत्नातूनच पुढे पुरातत्व खात्याने या मंदिराचे संरक्षण व जतन करण्याचा निर्णय घेतला. Ancient Monuments Preservation Act 1904 नुसार मुंबई सरकारने दि. 4 मे 1909 रोजी पेडगाव येथील लक्ष्मी–नारायण मंदिराचे जतन व संरक्षण करण्याचा निर्णय घेतला. 26 मे 1909 रोजी सरकारने या संदर्भात आणखी एक निर्णय घेतला. त्यानुसार पेडगावच्या लक्ष्मी–नारायण मंदिराचा समावेश सरकारने संरक्षित स्मारकांच्या यादीत केला आहे. [13] सध्या हे मंदिर भारत सरकारच्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात असून श्रींगोद्यातील वास्तुकलेचा वारसा सांगत आहे.

## 2) बालेश्वर/बाळेश्वर मंदिर

लक्ष्मी–नारायण मंदिराच्या समोरच आणखी एक हेमाडपंती शैलीचे मंदिर दृष्टिस पडते. हे मंदिर महादेवाचे असून या मंदिराला बाळेश्वर किंवा बालेश्वर मंदिर या नावाने देखील संबोधले जाते. या मंदिरावरील हेमांडपंती स्थापत्य शैलीचा प्रभाव लगेचच दिसून येतो. गर्भगृह, अंतराल आणि सभामंडप असा या मंदिराचा तलविन्यास असून हे मंदिर 13 व्या शतकात बांधले असावे. [14] मंदिराची खूप पडझड झालेली असून सध्या अस्तित्वात असलेल्या अवशेषांवरुनच मंदिराची कल्पना करावी लागते. मंदिराचा गाभारा शाबूत असून सभामंडपाचा जवळजवळ सर्वच भाग पडलेला आहे. सभामंडपाचे छत पूर्णपणे उध्वस्त झालेले असून केवळ उत्तर दिशेने थोडीशी भिंत शिल्लक आहे. तसेच सभामंडपाचे स्तंभ जमीनीत पाय रोवून उभे आहेत. या स्तंभांवरुनच सभा मंडपाच्या रचनेचा अंदाज येतो. या सभामंडपाला सोळा स्तंभ असून यातील काही अर्धस्तंभ आहेत. सभामंडपाची रचना नवमंडप अशा स्वरुपाची आहे. सभामंडपावरील स्तंभावर उत्कृष्ट नक्षीकाम केलेले आहे. आजही त्या आकृती स्तंभावर स्पष्टपणे दिसतात. गर्भगृहामध्ये महादेवाची पिंड असून ती नंतर केव्हातरी बसवली आहे, हे स्पष्टपणे दिसते. आज मात्र या मंदिराची दुरावस्था असून ते जिर्णोद्वाराच्या प्रतिक्षेत आहे.

पुरातत्व खात्याचे प्रमुख हेन्री कझिन्स यांनी 1880 च्या सुमारास या मंदिराला भेट दिली होती.[15] तसेच या मंदिराचे ड्रॉईंग बनवले व फोटो देखील घेतले होते. हेन्री कझिन्स यांनी या मंदिराचे वर्णन करुन ठेवलेले आहे. हेन्री कझिन्स यांच्या प्रयत्नातून या मंदिराचा समावेश पुढे संरक्षित स्मारकांच्या यादीत झाला आहे. दि. 29 ते 1914 मधील एका नोटिफिकेशननुसार या मंदिराचा समावेश संरक्षित स्मारकाच्या रुपात झाला. दिनांक 17 नोव्हेंबर 1914 च्या नोटिफिकेशननुसार व 1904 च्या कायदयानुसार सदर बालेश्वर मंदिराचा संरक्षित स्मारक म्हणून पुरस्कार करण्यात आला.

## 3) मल्लिकार्जुन मंदिर

लक्ष्मी नारायण मंदिराच्या व बालेश्वर मंदिराच्या उत्तरेस अगदी जवळच सुमारे 100 मी. अंतरावर मल्लिकार्जुन नावाचे महादेवाचे मंदिर आहे. या मंदिराचे वैशिष्टय म्हणजे हे मंदिर त्रिदल पध्दतीचे मंदिर आहे. मध्यभागी सभामंडप व पश्चिम उत्तर व दक्षिण दिशेला तीन गर्भगृहे असा या मंदिराचा तलविन्यास आहे. मंदिराचे द्वार पूर्व दिशेला असून सध्या हे मंदिर जीर्ण अवस्थेत आहे. या मंदिराचे चारठाण येथील नरसिंह मंदिराशी साम्य आहे. येथील मल्लिकार्जुन मंदिराच्या प्रवेशद्वार व वितान यांचे चारठाण येथील नरसिंह मंदिराशी काही प्रमाणात साम्य दिसते. [17]

## 4) रामेश्वर मंदिर

रामेश्वर मंदिरापासून अगदी थोडया अंतरावर रामेश्वर मंदिर आहे. हे मंदिर महादेवाचे असून सन 1884 मध्ये प्रकाशित झालेल्या गॅझेटियरमध्ये या मंदिराची नोंद घेतली गेली आहे. त्यानुसार हे मंदिर पडझड झालेल्या अवस्थेत असून केवळ गर्भगृह आणि सभामंडपाचे दोन स्तंभ शिल्लक राहिले होते. या मंदिरातील स्तंभांमध्ये कोरीव काम केलेले असून ते नष्ट होत चालले आहे.

आज हे मंदिर अतिशय विदीर्ण अवस्थेत असून मंदिराचे छत पूर्णपणे नष्ट झाले आहे. गर्भगृह आणि सभामंडप देखील नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पेडगाव मधील लक्ष्मी नारायण मंदिर, बालेश्वर मंदिर व मल्लिकार्जुन मंदिराच्या तुलनेत हे मंदिर अतिशय साधे वाटते. मंदिराच्या स्तंभावर फारसे नक्षीकाम दिसत नाही. यादव कालखंडाच्या अगदी शेवटच्या टप्प्यात हे मंदिर बांधले गेले असावे. मंदिराच्या रचनेवरुन हे मंदिर यादवांच्या स्थापत्य शैलीचा अर्थातच हेमाडपंती शैलीचा वारसा सांगते हे मंदिर देखील जीर्णोध्दाराची प्रतिक्षा करीत आहे.

## 5) भैरवनाथ मंदिरः–

पेडगावच्या मंदिरांमध्ये आणखी एक मंदिर हेमांडपंती शैलीमध्ये रचले असून ते भैरवनाथांचे मंदिर म्हणून ओळखले जाते. भैरवनाथ हे देखील शिवाचे एक रुप मानले जाते. हे मंदिर सद्य परिस्थितीत पाहिले असता अतिशय विचित्र अवस्थेत दिसते. मूळ स्थितीतील मंदिर आणि मंदिराच्या काही भागाचा केलेला जीर्णोद्वार यामुळे या मंदिराची हि विचित्र अवस्था झालेली आहे. मंदिराचा गर्भगृह, सभामंडप आणि मुखमंडप असा तलविन्यास

असून मंदिराच्या सभामंडपाला दोन प्रवेशद्वारे आहेत. मंदिराचे प्रवेशद्वार हे दक्षिण दिशेला असून तीन टप्प्यामध्ये मंदिरात प्रवेश करता येतो. प्रथम मुखमंडप नंतर सभामंडप आणि गर्भगृह. या मंदिराचा सभामंडप 20’X30’ असा असून मंदिराच्या दक्षिण आणि पूर्व दिशेला प्रवेशद्वारे आहेत. आतील गर्भगृहाची रचना 6’X10’ अशी असून त्यामध्ये अगदी साधी भैरवनाथाची मूर्ती होती. [19] सध्या या मंदिराचा जीर्णोद्वार केला असून याठिकाणी सुमारे 3 फूटांचा चौथरा बांधलेला असून त्यावर भैरवनाथाची मूर्ती ठेवलेली आहे. ही मूर्ती आधुनिक काळातील असून खूपच रंगकाम केलेली आहे. मंदिराच्या सभामंडपाची रचना नवखंड स्वरुपाची असून सभामंडपातील स्तंभावर रेखीव अशा प्रकारचे कोरीव काम केलेले आहे. यामध्ये भैरवनाथाच्या विविध मुद्रा त्या स्तंभावर कोरलेल्या आढळतात. मंदिराला एकूण तीन दरवाजे असून दक्षिण दिशेला जे प्रवेशद्वार आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना देखील सुंदर अशा प्रकारचे कोरीव काम आढळते.

## समारोपः–

अशाप्रकारे केवळ पेडगाव येथील मंदिरे विचारात घेतली तर आज ही सर्व मंदिरे जीर्ण अशा एका किल्ल्यामध्ये असून (बहादूरगड किंवा धर्मवीरगड) ती सुध्दा जीर्ण अवस्थेत आहे. भिमा नदीच्या किनाऱ्यावर ही मंदिरे बांधलेली असून ही सर्व यादवकालीन हेमाडपंती शैलीचा वारसा सांगतात. काही अभ्यासकांच्या मते लक्ष्मी–नारायण मंदिर हे कल्याणी चालुक्य शैलीतील आहे. [20] तर अ.प्र.जामखेडकर यांच्या मते हे मंदिर यादवकाळातील असून हेमांडपंती शैलीतील आहे. [21] या मंदिरांमध्ये लक्ष्मी–नारायणाचे मंदिर हे बाराव्या शतकातील असून बाळेश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, भैरवनाथ मंदिर व रामेश्वर मंदिर ही मंदिरे तेराव्या शतकातील असावीत. भीमा नदीकाठी असलेला या मंदिरांचा समूह आजही यादवांच्या वैभवाची साक्ष देतो. यातील लक्ष्मी–नारायण मंदिर व बाळेश्वर मंदिर ही पुरातत्व खात्याच्या ताब्यात असून इतर मंदिरे मात्र जीर्णोद्वाराची वाट पाहत आहे. स्थापत्याचा अनमोल वारसा आपण गमावत चाललो आहे असेच म्हणावे लागते.

## संदर्भ व तळटिपा


1. अ.प्र.जामखेडकर, महाराष्ट्रः इतिहास प्राचीन काळ (खंड–1, भाग–2), स्थापत्य व कला, दर्शनिका विभाग, मुंबई 2002, पृ. 209.
2. प्रभाकर गद्रे, मंदिर स्थापत्याचा इतिहास, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, 2010, पृ. 121.
3. जालवातायनाला असतात तशी जाळी खोदलेल्या प्रस्तराने बांधलेल्या भिंती म्हणजे जालभित्ती होय.
4. अ.प्र.जामखेडकर, उपरोक्त, पृ. 210.
5. प्रभाकर देव, मराठवाडयातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पविष्कार, ( अनु. कल्पना रायरीकर ), अपरांत प्रकाशन, पुणे 2017, पृ. 102.
6. एडीटर, ॲन्युअल रिपोर्ट ऑफ म्हैसूर, आर्किऑलॉजिकल डिपार्टमेंट 1946, प्लेट XII.
7. एडीटर, ए.एस.डब्ल्यू. आय पृष्ठ–3, प्लेट–58, एस.एम.डी. 1–76, किलहर्न लिस्ट, 352.
8. अ.प्र.जामखेडकर, उपरोक्त, पृ. 211.
9. कित्ता, पृ. 211.
10. अशोक नेवासेकर, श्रीगोंदे तालुक्याची ऐतिहासिक पाहणी पृ. 82
11. कित्ता, पृ. 83.
12. www.dsal.uchicago.edu
13. Notification of centrally protected monuments in India Ahmednagar The temple of Laxmi Narayan Notification No. 2704 (A) 26 may 1909.
14. Ibid, Page
15. http://www.bl.uk.
16. Notification of Centrally Protected Monuments in India Ahmednagar Baleshwar Temple Notication No. 9292. 17 Nov-1914.
17. कझिन्स हेन्री, चालुक्यन आर्किटेक्चर, प्लेट – XII.

**18.** अहमदनगर जिल्हा गॅझेटियर, 1884, पृ. 732.
**19.** कित्ता पृ. 732.
**20.** अशोक नेवासकर, उपरोक्त, पृ. 82.
**21.** अ.प्र.जामखेडकर, उपरोक्त, पृ. 211.

## निवडक संदर्भग्रंथ
## मराठी ग्रंथ


1) अहिरराव प्र.रा., 'भारतीय मूर्तिपूजेचा इतिहास', पुणे, 1996.
2) खरे गणेश हरि, 'मूर्तिविज्ञान', भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, 1939
3) जामखेडकर अ.प्र., महाराष्ट्रः इतिहास प्राचीन काळ (खंड–1, भाग–2) स्थापत्य व कला, दार्शनिका विभाग, मुंबई, 2002.
4) देशपांडे सु.र., भारतीय शिल्पवैभव, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, 2005.
5) देव प्रभाकर, मराठवाडयातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पविष्कार (अनु.कल्पना रायरीकर), अपरांत प्रकाशन, पुणे 2017.
6) नेवासकर अशोक, श्रीगोंदे तालुक्याची ऐतिहासिक पाहणी, वार्षिक, अहमदनगर, महाविद्यालय, 1979.
7) माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2014.
8) सांकलिया ह.धी. व माटे व श्री., महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, 1976.


**English Sources:-**


**1)** Cousens Henry, The Medieval Temples of Deccan, Calcutta, 1931.
**2)** Deshpande S.R. Yadav Sculpture, B.R. Publication, Delhi, 1985.
**3)** Deglurkar G.B., Temple Architecture And Aculpture of Maharashtra, Nagpur University, Nagrpur, 1974.
**4)** Kanhere G.K. Temples of Maharashtra, Maharashtra Information centre, Delhi, 2002
**5)** Varma O.P, A Survey of Hemadpanti Temples in Maharashtra, Nagpur, 1973.
**6)** Ahirrao P.R., Survey of Hemandpanti Temples in India.
**7)** Deo P.R., Temples of Maharashtra, Unpublished Ph.D. Thesis, Library of Maharashtra University, Aurangabad.